# MT

Seat No. ☐☐☐☐☐☐☐

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - II - PAPER - VI

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**उ.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **कृती पूर्ण करा.** 1

**पुलावरून चक्कर मारावी म्हणून लेखकांनी केलेली कृती**
↓ उठले
↓ चालू लागले

(ii) **कारण लिहा.** 1

लेखक चार-पाच दिवस संध्याकाळी ओंकारेश्वराला गेले नाहीत कारण त्यांना कामांमुळे उसंत लाभली नाही.

(२) (i) **फक्त नाव लिहा.** 1

लेखकांना एकदम आठवण झाली ⟶ भिक्षेकरी वृद्धाची

(ii) **कोण कोणास म्हणाले ते लिहा.** 1

**''बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हाला दोन शाली दिल्या होत्या.''**

**कोण** ↓ लेखक

**कोणास** ↓ भिक्षेकरी म्हाताऱ्याला

(३) **व्याकरण** 1

(i) **कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिहा.**

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला.

(ii) तक्ता पूर्ण करा. 1

| शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|
| १. पोटाची | पोट | पोटा |
| २. अभाग्यांना | अभागी | अभाग्यां |

(४) **स्वमत :** 2

आजकाल घरातून बाहेर पडल्यावर समाजात वावरताना, कुठे प्रवास करताना, वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना भेटी देताना ठिक-ठिकाणी आपणास गरीब, लाचार, दीन लोकं दिसतात. ज्यांच्या अंगावर साधे स्वच्छ, नीटनेटके कपडेही नसतात. त्यांना राहायला व्यवस्थित जागाही नसते. अंथरण्यास पांघरण्यास काही कपडेही नसतात. अशा सर्व प्रकारच्या लोकांना पाहिल्यावर वाटते, की त्यांना योग्य आश्रमात नेऊन आश्रय द्यावा. घरातील काही, न वापरण्याजोगे परंतु चांगले स्वच्छ न फाटलेले कपडे त्यांना द्यावेत. घरातील ठेवणीच्या शाली, चादरी ज्या आपण उपयोगात आणत नाही, त्या अशा लोकांना द्याव्यात. भुकेल्यांना दोन घास भरवावेत. तहानलेल्यांना पाणी पाजून शांत करावे. जेणेकरून त्यांचे थोडेतरी दु:ख कमी व्हावे.

उ.१ आ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** 2

(१) **कृती करा.**

(i) **कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी अभिषेक हे करणार होता.** → अभिषेक कॉलेजला जाताना सायकलचा वापर करणार होता.

(ii) **बाबांच्या मते आपण याचं नाटक करतो** → व्यायामाकरता वेगळं मॉर्निंग वॉक करण्याचं

(२) **(i) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** 1

मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार, मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत.

**(ii) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** 1

**''पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी,''**

| कोण | कोणास |
|---|---|
| सुमित | घरातील सर्वांना |

| | | |
|---|---|---|
| (३) | **व्याकरण**<br>**(i) सूचनेनुसार सोडवा.**<br>उभयान्वयी अव्यय - पण | 1 |
| | **(ii) अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**<br>आपल्याला झाड लावावे लागेल. | 1 |
| (४) | **स्वमत :**<br>हवेत सोडला जाणारा कार्बन आणि निसर्गात निर्माण होणारा ऑक्सिजन यांच्या प्रमाणात प्रचंड असमतोल आपण प्रदुषणाच्या माध्यमातून अनुभवतो. निर्माण होणारे औद्योगीकरण, झाडांची प्रचंड कत्तल, कारखान्यातून निघणारा धूर यांमुळे ऑक्सिजनच्या प्रमाणात घट होते आहे. या सगळ्याचा विचार करता, विकास करताना पर्यावरणाचा नाश होणार नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे. जेवढी झाडे कापली आहेत, तेवढी वाढवली पाहिजेत. लोकसंख्येवर नियंत्रण आणले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीचा अभ्यास करून ती पर्यावरण पुरक कशी होईल याचा विचार केला पाहिजे, तरच ऑक्सिजनचे प्रमाण वाढून हवेतील कार्बनचे प्रमाण कमी होऊ शकते. | 2 |
| उ.१ इ. | **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** | |
| (१) | **खालील कृतीचा परिणाम लिहा.**<br>**(i)** मुंबईच्या स्टेशननजीक राहणारे कुठे परगावी गेले तर आगगाड्यांच्या धडधडाटाशिवाय झोप येत नाही.<br>**(ii)** ट्रान्झिस्टर लावून अभ्यास करणाऱ्यांना ट्रान्झिस्टर नसला तर त्यांचा अभ्यास व्हायचा नाही. | 2 |
| (२) | **उत्तरे लिहा.**<br>(i) सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेणे.<br>(ii) शेतकी, कला-कौशल्य, मजुरी. | 2 |
| (३) | **व्याकरण :**<br>**सूचनेनुसार सोडवा.**<br>(i) भूतकाळ<br>(ii) कर्कश - विशेषण | 2 |
| (४) | **स्वमत :**<br>माणसाने कधीही सवयीचे गुलाम नसावे. मनुष्याला खूप वेगवेगळ्या प्रकारच्या सवयी असतात. मग त्या रोजच्या जीवनातील असू द्यात किंवा त्याच्या नित्य कामातील असू द्यात. व्यक्ती सवयीचा इतका गुलाम असतो की, त्याशिवाय त्याचे पाणीही हालत नाही.<br>उदा. (१) एखाद्या व्यक्तीस ठरलेल्या वेळेत जेवण मिळाले नाही तर त्याची चिडचिड होते. तो | 2 |

घरातील स्त्रीयांवर राग व्यक्त करतो. आवडता पदार्थ पानात वाढला गेला नाही तर तो जेवतही नाही.

उदा. (२) एखाद्या विद्यार्थ्यास खूप वेळपर्यंत झोपण्याची सवय असेल तर अचानक एखाद्या दिवशी त्याला लवकर उठावे लागले तर तो पूर्ण दिवस बसून दिसेल तेथे डुलक्या काढताना दिसतो. त्या अपूर्ण झोपेचा परिणाम त्याच्या पूर्ण दिवसाच्या कामावर दिसून येतो.

माणसाने प्रत्येक गोष्टीला प्रसंगानुसार सामोरे जावे. त्याने दोन्ही गोष्टी सकारात्मक विचाराने स्वीकारल्या पाहिजेत. मग बघा आयुष्य किती सुंदर आहे. म्हणून कोणत्याही माणसाने सवयीचे गुलाम नसावे.

## विभाग २ – पद्य

उ.२ अ. **खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **जोड्या जुळवा.** 2

| | 'अ' गट | उत्तरे |
|---|---|---|
| (i) | कनवाळू | माता |
| (ii) | भुकेलें | वत्सर |
| (iii) | चिंतीत | हरणी |
| (iv) | विनवितो | चातक |

(२) **(i) खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

भुकेल्या वासराला पाहून धेनू (गाय) हंबरत धावून येते.

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

<u>नामा</u> म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।

(३) **खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.** 2

वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक संत नामदेव महाराज अगदी मनापासून आर्तपणे विठ्ठलाचा धावा करतात. त्यासाठी ते अतिशय समर्पक दृष्टान्त देतात. ते म्हणतात की, ज्याप्रमाणे नजरचुकीने अग्नित सापडलेल्या बाळाला वाचवण्यासाठी त्याची आई व्याकूळ होऊन , काळजीने त्याच्याजवळ धावून जाते. त्याला मायेने, प्रेमाने उचलून घेते. त्याचप्रमाणे हे प्रभू, विठ्ठला, मी पूर्णपणे तुझा अंकित आहे. मी तुझा दास, सेवक आहे. आईप्रमाणे तुम्ही माझ्या अडचणीत, माझ्या कार्यात व्याकूळ होऊन धावत या.

(४) 2

आईच्या प्रेमाला जगात दुसरी उपमा नाही. 'आई सारखी मायाळू आईच' असे म्हणतात. मग ती आई कोणीही असो. प्राणी असो की पक्षी असो. तिचे बाळ, लेकरू, पिल्लू जर संकटात असेल तर ती त्याला सोडवण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालतेच घालते. प्रस्तुत अभंगातून आईच्या प्रेमाची महती सांगताना संत नामदेव सांगतात की, 'आगीमध्ये जर एखादं बाळ सापडलं तर त्याची दयाळू आई अती व्याकूळ

| | | |
|---|---|---|
| | होऊन त्याला वाचवते.' प्राण्याच्या प्रेमाबद्दल सांगताना संत नामदेव सांगतात की, 'एखादया गाईचे वासरू भूकेने व्याकूळ होऊन ओरडत असेल तर ती माता (गाय) त्याच्यासाठी धावून जाते. त्याचप्रमाणे जंगलाला वणवा लागला असेल आणि जर एखादया हरिणीचे पाडस त्यात सापडले तर ती हरिणी त्यास वाचवण्यास अती चिंतातूर होते. त्याचप्रमाणे एखादया पक्षिणीचे पिल्लू घरट्यातून खाली जमिनीवर पडले तर ती पक्षिणी त्याला वाचवण्यासाठी लगेच झेप घेते असे सांगितले आहे. | |
| उ.२ आ. | **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :** | |
| (i) | **योगी सर्वकाळ सुखदाता** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>संत एकनाथ | **1** |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' ही कविता एक 'अभंग' आहे. | **1** |
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग 'एकनाथी भागवत' शासकीय प्रत' या संग्रहातून घेतला आहे. | **1** |
| (४) | **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातून 'शम (शांती)' हा स्थायी भाव दिसून येतो. | **1** |
| (५) | **कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>जळ वरीवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।।<br>उदक करी सुखी एकवेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।। | **2** |
| (६) | **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>संत एकनाथांनी योगी पुरूष आणि पाणी यांचे समाजासाठीचे योगदान दाखवून दिले आहे. चंद्रकिरण व चकोर, पांखोवा व पिल्ले, जीवन (पाणी) व जीव या उदाहरणांच्या अप्रतिम वापराने मनातील भाव समर्पकरित्या व्यक्त झालेला आहे. त्यामुळे हा अभंग मनापर्यंत पोहोचतो. मेघांचे रूपक घेऊन योगी पुरूषांचे खालुते येणे ही एकनाथ महाराजांनी योजलेली कल्पना मनाला भावल्यामुळे हा अभंग मला खूप आवडला आहे. | **2** |
| (ii) | **दोन दिवस** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>नारायण सुर्वे | **1** |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'दोन दिवस' या कवितेचा रचनाप्रकार 'मुक्तछंद' हा आहे. | **1** |

| | | |
|---|---|---|
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'दोन दिवस' ही कविता 'ऐसा गा मी ब्रह्म!' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. | 1 |
| (४) | **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –**<br>'दोन दिवस' या कवितेतून 'दु:ख' हा स्थायी भाव दिसून येतो. | 1 |
| (५) | **कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;<br>भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. | 2 |
| (६) | **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>कवी नारायण सुर्वे यांची 'दोन दिवस' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भाकरीचा चंद्र शोधण्यात ज्यांची जिंदगी बरबाद होते त्या सगळ्या कष्टकरी, कामगार, श्रमिक, गरीब लोकांचा सोशिकपणा, त्यांचा संयम, त्यांचे दु:ख कवीने सहजपणे वाचकांसमोर मांडले आहे. कवीने वेदनेचा भाव कोणत्याही प्रकारची चीड, संताप किंवा आक्रस्ताळेपणाने न मांडता अत्यंत संयमी आणि सुयोग्य प्रतिकांचा वापर करून मांडले आहे. सर्वस्व असलेले हात, माना उंचावलेले हात, कलम झालेले हात यांसारखी प्रतिके मनाला अंतर्मुख करून जातात. त्यामुळेच ही कविता मनाला भिडते. | 2 |
| उ.२ इ.<br>(१) | **खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>'दोन दिवस' या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' असे भीषण जीवनसत्य मांडले आहे.<br>कवीने अत्यंत साधेपणाने आपल्या जीवनाचे सत्य वरील ओळीतून व्यक्त केले आहे. खरं तर चंद्र, चांदणे एखाद्या कविसाठी सृजनशिलतेची प्रतिकं, पण नारायण सुर्वेनी हीच प्रतिकं आपल्या वास्तवाशी जोडली. भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली. किती दाहक सत्य पण नारायण सुर्वेनी कोणत्याही भावनेचा अतिरेक न करता अत्यंत संयमी शब्दात ते आपल्यासमोर मांडले आहे.<br>भाकरीचा चंद्र शोधण्यात ज्यांची जिंदगी बरबाद होते; त्या सगळ्या सामान्य, कष्टकऱ्यांचा सोशिकपणा, त्यांचा संयम, शब्दांवर कोणताही साज न चढवता सहजपणे वाचकांसमोर मांडला आहे. भाकरीचा चंद्र शोधण्यात ज्यांची जिंदगी बरबाद होते; त्या सगळ्या सामान्य, कष्टकऱ्यांचा सोशिकपणा, त्यांचा संयम, शब्दांवर कोणताही साज न चढवता सहजपणे वाचकांसमोर मांडला आहे. येथे करूणारसाचा प्रत्येय येतो. | 4 |
| | **विभाग ३ – स्थूलवाचन** | |
| उ.३.<br>(१) | **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**<br>लेखक ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाले. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला त्यांना सांगण्यात आले. त्यासाठी लागणारी सामग्री तिथे होती, पण आतापर्यंत ती कोणीही वापरलेली नव्हती. त्यामुळे लेखक म्हणाले की, ते काम करण्यास तयार आहेत, केवळ त्यांना | 3 |

| | | |
|---|---|---|
| | मदतीसाठी एक वेल्डर आणि एक फोरमनची गरज आहे. त्यावेळी त्यांना नकार देण्यात आला. आपल्याला स्वत:लाच सगळे करावे लागेल असेही सांगण्यात आले. वरिष्ठांची आज्ञा म्हणून लेखकाने सुरुवात केली. बरीच धडपड करून लेखकाने ते काम पूर्ण केले. मग वरिष्ठांकडून या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्यात आली. 'हे करूया, ते करूया', असे बरेच काही काही बोलले गेले. नंतर वरिष्ठांनी लेखकाला विचारले की, ''आता सांग, तुला काय काय पाहिजे ? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आणखी काही हवे असेल तर तेही मिळेल.'' त्यावेळी लेखक म्हणाले की, ''मला आता काहीच नको. मी स्वत: सगळे काम करीन.'' त्यावेळी लेखकाला सांगण्यात आले की, काम सुरू करण्याआधीच लोक वेगवेगळ्या मागण्या करतात आणि त्यांच्या या वृत्तीमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम अजिबात झालेले नव्हते. स्वत:ला काम करता येत नसताना दुसऱ्यांवर काम ढकलण्याच्या प्रक्रियेमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम सुरू झालेले नव्हते, असे मला वाटते. | |
| (२) | वेगवेगळ्या ठिकाणचा सूर्यास्त वेगवेगळे सौंदर्य, वेगळे भाव, वेगळे रंग निर्माण करत असतो. माणसाची मनोदशा जशी असेल तसे भावतरंग सूर्यास्ताच्या वेळी त्याच्या मनात निर्माण होत असतात. वाळवंटाच्या ठिकाणचा सूर्यास्त. वाळूच्या विस्तीर्ण पसरलेल्या अथांग भूप्रदेशावर सोनेरी मऊसार किरणे पसरवत असतो. मन अगदी तृप्त करून तो अस्ताला जातो. तेथील वाळूचा सागर हळूहळू थंड होत जातो. शितल वाऱ्याच्या झुळका वाहू लागतात. मानव, पशू, पक्षी सुखावून जातात. वाळूचा थंड स्पर्श, वाऱ्याची थंड झुळूक यामुळे मानवी मन सुखावून जाते. त्या सुवर्णमयी वातावरणात नव्या संकल्पना, जुन्या संवेदना जाग्या होतात. कवी, लेखक, चित्रकार यांना नवीन कल्पना सुचतात. समुद्राच्या ठिकाणी अस्ताला जाणाऱ्या सूर्यास्ताचे दर्शन मोठे विलोभनीय असते. हळू हळू सागराच्या कुशीत सामावणाऱ्या सूर्याला बघून वाटते की, हा सागरात मिसळून जातो. म्हणूनच चमकदार मोती निर्माण होतात. सुंदर रंगीत प्रवाळ आणि अनंत असे जीव निर्माण होतात. समुद्राच्या लाटांसोबत हेलकावे खात हा तेजोगोल जेव्हा सागरात सामावतो तेव्हा आपोआप त्या सृष्टीकर्त्या पुढे आपण नतमस्तक होतो. | 3 |
| (३) | महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. आधी केले, मग सांगितले या उक्तीप्रमाणे सर्व संतांनी कार्य करून दाखवले आहे. उदाहरणे द्यायचीच तर संतांनी प्राण्यांवर दया करण्याचा संदेश आपल्या अभंगातून फक्त दिला नाही तर संतांनी ते करूनही दाखवले. संत नामदेव भुकेल्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन धावत गेले. संत एकनाथांनी भर उन्हात तडफडत असणाऱ्या गाढवाला काशीहून आणलेल्या गंगेचे पाणी पाजून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व थोर समाजसेवक व समाजसुधारक गाडगे महाराज यांनी स्वत: आधी हातात झाडू घेऊन गावातील केरकचरा दूर करण्यापासून ते विष्ठा उचलण्याची कामे केली. देवाच्या नावाने कर्मकांड करण्यापासून अडवले. मूर्तीपूजा न करता गोरगरीब मानवाची पूजा करा, त्यांची सेवा करा हे लोकांना आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून पटवूनही दिले. बाबा आमटे हे ही आधुनिक काळातील राष्ट्रसंतच म्हटले पाहिजेत. रस्त्यावर महारोग होऊन पडलेल्या तुळशीरामला पाहून त्यांच्या मनात कुष्ठरोग्यांच्या बद्दल सेवाभाव जागृत झाला व त्यातूनच चंद्रपूर येथे 'आनंदवनाची' निर्मिती झाली. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत पाश्चात्य देशांनी त्यांना पुरस्कृतही केले. या सर्व उदाहरणांवरून 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीची सार्थकता स्पष्ट झाल्यासारखे वाटते. | 3 |

**विभाग ४ – भाषाभ्यास**

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | चौकोन | चार कोनांचा समूह | द्विगू समास |
| (ii) | पदोपदी | प्रत्येक पदी | अव्ययीभाव समास |

(ii) **अलंकार** 2

**खालील ओळीतील उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान धर्म (गुण) असे वर्गीकरण करा.**

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| तुझी माया | आभाळ | गत | ----- |

(iii) **तक्ता पूर्ण करा** 2

| वाक्य | प्रकार ओळखा | सूचनेनुसार बदल करा. |
|---|---|---|
| १. ही कल्पना चांगली आहे. | होकारार्थी वाक्य | ही कल्पना वाईट नाही. |
| २. किती पाऊस पडला हो काल रात्री ! | उद्‌गारार्थी वाक्य | काल रात्री खूप पाऊस पडला. |

(iv) **सामान्यरूप** 2

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|
| १. माणसांची | माणसे | माणसां |
| २. पावसात | पाऊस | पावसा |

(v) **वाक्प्रचार** 2

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. आजकालची मुले मोठ्या माणसांना दुरूत्तरे करताना दिसतात.

२. रामरावाच्या दुकानात इतकी गर्दी होती की, त्यांना जेवायला उसंत लाभली नाही.

उ.४ **(आ) भाषासौंदर्य**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

(अ) मूर्ती बनविणारा - मूर्तीकार

(आ) देवाचे अस्तित्व मानणारा - आस्तिक

| | | |
|---|---|---|
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>(अ) खाजगी × सार्वजनिक (आ) भरती × ओहोटी | 1 |
| (iii) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>कर ← **हस्त** → हत्ती | 1 |
| (iv) | **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**<br>रंगमंचांवर - रंग, वर, गर, मंचावर, रग, वग | 1 |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन**<br>(i) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. | 1 |
| | (ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.**<br>(अ) कवयित्री<br>(आ) पारंपरिक | 1 |
| (३) | **विरामचिन्हे**<br>**खालील वाक्यातील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.**<br>त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. | 2 |

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| '-' | एकेरी अवतरण चिन्ह. |
| . | पूर्ण विराम |

| | | |
|---|---|---|
| (४) | **पारिभाषिक शब्द**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>१. Mobile - भ्रमणध्वनी<br>२. Dismiss - निष्कासित, बडतर्फ | 1 |
| (५) | **भाषिक खेळ**<br>**खालील तक्त्यातील २ अक्षरी दोन अर्थपूर्ण शब्द शोधा.**<br>वारा, वायू, हवा, रात्र, पाणी, माती, झाडे, वडे, घोडे, मात, वाणी, वाती. | 1 |

## विभाग ५ – उपयोजित लेखन

प्र.५ अ. **खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन**

(i) दि. १० ऑक्टोबर, २०१८ — 5

प्रति,
मा. मुख्याध्यापक,
शारदा विद्यामंदिर,
मु.पो. आंबिवली,
तालुका - महाड, जिल्हा - रायगड.

विषय – गरीब विद्यार्थी फंडातून गणवेश व शैक्षणिक साहित्य मिळण्याबाबत विनंती पत्र...

आदरणीय गुरूवर्य,
सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., आपल्या शाळेत इयत्ता '१०वी/ब' मध्ये शिकत आहे. माझ्या वडिलांचे वार्षिक उत्पन्न फारच कमी आहे. त्यामुळे मला शाळेचा गणवेश व शैक्षणिक साहित्य विकत घेणे अशक्य आहे.

मला वर्गशिक्षकांकडून असे कळले आहे की, आपल्या शाळेतून गरीब विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्यासाठी सहाय्य केले जाते. तरी मला शाळेकडून तो लाभ मिळावा, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विद्यार्थी,
अ. ब. क.

मातृसदन,
मु.पो. आंबिवली,
तालुका - महाड,
जिल्हा - रायगड.

(ii) दि. १० नोव्हेंबर, २०१८ — 5

प्रति,
मा. मुख्याध्यापक,
शारदा विद्यामंदिर,
मु.पो. आंबिवली,
तालुका - महाड, जिल्हा - रायगड.

विषय – चार दिवसांच्या रजेसाठी विनंती अर्ज.

आदरणीय गुरूवर्य,
सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., आपल्या 'शारदा विद्यामंदिर' या शाळेत इयत्ता १० वी/अ या वर्गात शिकत आहे. दि. १५ नोव्हेंबर रोजी माझ्या मोठ्या बहिणीचे लग्न आहे. लग्न हे घरातलेच असल्यामुळे कृपया दि. १३ नोव्हेंबर २०१६ ते १६ नोव्हेंबर २०१६ पर्यंत चार दिवसांची रजा मंजूर करावी, ही नम्र विनंती. हे दहावीचे महत्त्वाचे वर्ष आहे. त्यामुळे या दिवसांत शाळेत झालेला अभ्यास मी स्वत: त्वरीत पूर्ण करीन, अशी खात्री देतो.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विद्यार्थी,
अ. ब. क.

मातृसदन,
मु.पो. आंबिवली,
तालुका - महाड, जिल्हा - रायगड.

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

माणूस हा सवयीचा गुलाम आहे. गाड्यांच्या धडधड आवाजात गाढ झोपणाऱ्या माणसांना शांततेत झोप येत नाही. रोज टॅक्सीने प्रवास करणाऱ्यांना टॅक्सीची भाडेवाढ झाली आणि टॅक्सीचा प्रवास परवडेनासा झाला म्हणून बसच्या रांगेत उभे राहणे नकोसे होते. थोड्याशा आवाजानेही काहींची एकाग्रता भंग होते तर कानाला ट्रान्झिस्टर लावल्याशिवाय काहींचा अभ्यासच होत नाही. हा सर्व सवयीचा परिणाम आहे.

उ.५ आ. **खालील कृती सोडवा.**

(१) **खालील जाहिरातीचे अधिक आकर्षक स्वरूपात पुनर्लेखन करा.** 6

*डोळे हे जुल्मी गडे ऽऽ*

*सुंदर, आकर्षक चष्मे व गॉगल्ससाठी*



**दिक्षित ऑप्टीक्स**

**खास सवलतीच्या दरात १ मार्च ते ७ मार्चपर्यंत उपलब्ध**
**४०% पर्यंत घवघवीत सूट**

*त्वरा करा !* *त्वरा करा !!* *त्वरा करा !!!*

व्ही. ए. दिक्षित
गणेशवाडी, बाबू गेनू मार्ग, दादर (प.)

| | | |
|---|---|---|
| (२) | **कथा लेखन**<br>**खालील शब्द गुंफून एक छानशी कथा तयार करा. कथेला शीर्षक दया**<br><br>**मैत्री**<br>एक होती चिमणी, एक होता कावळा. दोघांत खास मैत्री होती. कावळा मात्र गरीब होता. चिमणी श्रीमंत होती. कावळ्याचं घर होतं शेणाचं, चिमंणीचं घर होतं मेणाचं.<br>एकदा काय झालं ? खूप मोठा पाऊस पडला. त्या पावसात कावळ्याचं घर वाहून गेलं. चिमणीचं घर तसंच होतं. मग कावळ्याने काय केले ? तो आला आपल्या चिऊताईकडे. त्याने दारावर टकटक केली आणि म्हणाला, ''चिऊताई चिऊताई, दार उघड.'' चिमणी घरातून आवाज देत म्हणाली, ''थाबं माझ्या बाळाला आंघोळ घालते.'' कावळेदादाने दिलेल्या प्रत्येक हाकेला चिमणी वेगवेगळी कारणे सांगत राहिली. कावळेदादाला मात्र दारापाशी ताटकळत उभं राहावे लागले. काही वेळाने पाऊस थांबला. कावळा नवीन घर बांधण्यासाठी निघून गेला. थोड्या दिवसांनी कावळ्याने आपले एक छान नवीन घर उभारले.<br>काही दिवसानंतर अचानक कडाक्याचे ऊन पडले. चिमणीचं घर मेणाचे होते. त्यामुळे काय झाले ? चिमणीचे घर वितळून गेले. आता चिमणी आपल्या पिल्लांना घेऊन कावळेदादाकडे मदत मागायला आली. तिने दारावर टकटक केली आणि म्हणाली, ''कावळेदादा कावळेदादा, दार उघड.'' कावळ्याने मात्र चिमणीप्रमाणे दार उघडायला उशीर केला नाही. त्याने पटकन दार उघडले व चिमणीला आपल्या घरात घेतले. कावळा व चिमणी यांचा परिवार एकत्र राहू लागला. कावळ्याने चिमणीला सांगीतले की, ''तुला जितके दिवस राहायचे आहे तितके दिवस तू आनंदाने रहा.''<br>कावळा नेहमी सकाळी लवकर बाहेर जात असे व उशिरा घरी परतत असे. एके दिवशी चिऊताईने कावळ्याला नेहमी सकाळी लवकर बाहेर जाण्याचे कारण विचारले. चिमणीकडे दुर्लक्ष करून कावळ्याने विषयांतर केले व एक दिवशी सर्वांना बाहेर फिरायला न्यायचे आश्वासन दिले.<br>ठरल्याप्रमाणे एके दिवशी सर्वजण फिरायला गेले. घरापासून दूर जंगलात येऊन पोहचले. प्रत्येकजण आपल्याला आवडेल त्या दिशेने झेपावत होता. झाडाच्या या फांदीवरून त्या फांदीवर उडी घेत होता. सर्वजण आनंदी होते. अचानक चिमणीचे लक्ष एका मोठ्या झाडावरील सुंदर घराकडे गेले. कावळ्याला मग चिमणीने विचारले की, ''हे घर कोणाच आहे?'' तेव्हा कावळेदादा चिमणीला म्हणला की, ''मी दररोज लवकर घरा बाहेर जाऊन उशीरा यायचो याचे कारण हेच आहे. हे घर मी तुझ्यासाठी बांधले आहे.'' चिमणी हे छानसे घर पाहून खूप खूश झाली आणि त्याने केलेली मदत पाहून तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. | 6 |
| उ.५ इ. | **लेखनकौशल्य**<br>**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** | |
| (१) | **हिमालयाचे आत्मवृत्त**<br><br>हो, मी हिमालय बोलतोय. जगातील सर्वात उंच पर्वत, भूलोकीचा स्वर्ग, देवांचे निवासस्थान, पृथ्वीचा मानदंड ! मीच भारतीय संस्कृतीचा जन्मदाता आहे. भारताचा इतिहास हा माझा इतिहास आहे. भारताचा गौरव हा माझा गौरव आहे. भारताच्या उत्तरेला २४०० किमीपेक्षाही जास्त माझा विस्तार आहे. माझी जन्मतिथी मला आठवत नाही. पण हो, इतके अवश्य आठवते की, वर्षानुवर्षे मी भारताचे रक्षण करत आलो आहे. असे ऐकण्यात आले होते की, एकदा चीनने भारतावर आक्रमण केले होते. कारण त्यांना माझ्यावर | 8 |

अधिकार गाजवायचा होता पण महान परंपरा असलेल्या या भारत देशाने त्यांच्या या आव्हानाला सडेतोड उत्तर दिले. माझ्या उंचीमुळे उत्तरेकडील अतिथंड वारे रोखले जाऊन भारतीय उपखंड सर्वकाळ उष्ण उबदार राहण्यास मदत होते. मी जर नसतो तर भारत वैराण झाला असता. खरंच मी भारताचा रक्षक आहे.

माझ्या मस्तकावर बर्फाचा सुंदर मुकूट आहे. एव्हरेस्ट, गॉडवीन, कांचनगंगा, लॉन्स, नंदादेवी ही माझी मुख्य शिखरे आहेत. यात एव्हरेस्ट सर्वांत उंच शिखर आहे. काही वर्षांपूर्वी शेरपा तेनसिंग नोर्के आणि एडमंड हिलेरीने माझ्या या शिखरावर प्रथम पदार्पण केले आणि अपूर्व यश मिळवले. त्यांच्या या साहसाचे मी अभिनंदन करतो. माझ्या अंगाखांद्यावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. मी तऱ्हेतऱ्हेच्या वृक्षांचा जन्मदाता आहे. माझ्या छायेत सिमला, मसूरी, नैनीताल, दार्जिलिंग इ. थंड हवेची ठिकाणे वसलेली आहेत. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा इ. नद्यांचा जन्मदाता मीच आहे. जगातील जवळपास १५० कोटी लोकांसाठी पाण्याचा मुख्य स्त्रोत मीच तर आहे. माझ्यात साधारणपणे जवळपास १५००० विविध हिमनद्या आहेत, ज्यात १२००० वर्ग किमी इतके पाणी सामावले आहे. उत्तरांचलमधील गंगोत्री, यमुनोत्री, पिडारी, काफनी तर नेपाळमधील एव्हरेस्टच्या सान्निध्यातील 'खूंबू' या माझ्या काही प्रसिद्ध हिमनद्या आहेत.

मी भारतीय संस्कृतीचा पिता आहे. आर्यांचे आदिस्थान मीच आहे. फार पूर्वीच्या काळात ऋषीमुनींनी येथेच तपश्चर्या केली होती. वाल्मिकी ऋषींनी 'रामायण' आणि व्यासांनी 'महाभारत' माझ्यात कुशीत रचलेले होते. चंद्रगुप्त राजाने आपल्या राष्ट्रोद्धाराचे चिंतन माझ्याच छायेत केले होते. पांडवांनी येथूनच स्वर्गारोहण केले होते.

मी माझ्या महानतेचे गुणगान कुठपर्यंत करू ? मी इतका विशाल आहे की, संसाराचे सर्व दु:ख माझ्यात सामावले जाईल. मी इतका शीतल आहे की सर्व प्रकारच्या चिंतेचा अग्नी शांत करू शकतो. मी इतका उंच आहे की, मोक्षप्राप्तीची शिडी बनवू शकेल आणि मी इतका धनाढ्य आहे की सर्व देवांत श्रीमंत असलेल्या कुबेरालासुद्धा आश्रय देऊ शकतो.

अहो, भारतवासियांनो ! हजारो वर्षांपासून तुमचा आणि माझा संबंध आहे. संपूर्ण जगाला सांगा की, 'हिमालय आमचा आहे.' घाबरू नका, मी तुमची सेवा, संरक्षण आणि मदत करण्यासाठी सदैव तत्परतेने उभा आहे.

(२) **मी पोलीस अधिकारी झालो तर....** 8

माणसाच्या तीन मूलभूत गरजा असतात. अन्न, वस्त्र आणि निवारा. पण अलिकडच्या काळात माणसाची आणखी एक गरज दिसू लागली आहे ती म्हणजे 'संरक्षण' ! आणि भारतातील नागरिकाला संरक्षण देण्याची जबाबदारी आपल्या पोलीस खात्यावर आहे, परंतु सध्या आपल्या पोलीस खात्यावर अनेक आरोप - प्रत्यारोप होत आहेत. एकेकाळी स्कॉटलंड पोलिसांनंतर ज्यांचे नाव घेतले जायचे त्या मुंबई पोलिसांवर आज अनेक आरोप केले जातात. अनेक चित्रपटांतून त्यांच्यावर टीका केली जाते. म्हणूनच कधी कधी मला वाटते - मी पोलीस अधिकारी झालो तर ....

सर्वप्रथम मी पोलिसांविषयी लोकांच्या मनात मित्रत्वाची भावना निर्माण करेन. पोलीस हे आपले शत्रू नसून मित्र आहेत. हे माझ्या कृतीतून लोकांना दाखवून देईन. सध्याच्या परिस्थितीत गुंडांपेक्षा लोक पोलिसांनाच घाबरतात. त्यांची काम करण्याची पद्धत लोकांमध्ये दहशत निर्माण करते. यात सुधारणा करून मी पोलीस व्यवस्थापनात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करेन.

मी पोलीस अधिकारी झालो तर प्रामाणिकपणे लोकांचे प्रश्न हाताळेन. ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' (निरपराध्याला संरक्षण अन् खऱ्या गुन्हेगाराला शासन) हा नियम मी कटाक्षाने पाळेन. सर्वसामान्य जनतेत पोलिसांबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करेन. पोलीस हे सर्वसामान्य जनतेचे भक्षक नसून रक्षक आहेत हे लोकांना पटवून देईन. दरोडे, खंडण्या, लूटमार, बलात्कार, खून व दहशत या साऱ्या प्रकारांना पूर्णपणे आळा घालण्याचा प्रयत्न करेन. 'हजार गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये', असे आपल्या कायद्याचे धोरण आहे. मी माझ्या हातून एकाही गुन्हेगाराला सुटू तर देणार नाहीच पण निर्दोषांना शिक्षाही होऊ देणार नाही.

आज आपण बघतो की महागाई फार वाढली आहे. त्यातच पोलिसांना मिळणारे वेतन फार कमी असल्याने ते लाच घेतात, भ्रष्टाचार करतात. मी 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा' हे व्रत समजून प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावण्याचा प्रयत्न करेन. पोलिसांवर अती कामामुळे मानसिक तणाव निर्माण होतो. त्यामुळे पोलिसांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. त्याकरिता मी सुधारणा करण्याचा प्रयत्न करेन. 'पोलीस आपला मित्र' अशी भावना लोकांच्या मनात निर्माण करीन. लोकांच्या विश्वासाला अजिबात तडा जाऊ देणार नाही. पोलिसांच्या चारित्र्याला लागलेला डाग पुसून टाकण्यासाठी मी विशेष प्रयत्न करेन.

मी जरी अधिकारी असलो तरी माझ्या अधिकाराचा गैरफायदा घेणार नाही. माझ्या सहकाऱ्यांशी सलोख्याचे संबंध ठेवेन. त्यांच्यामध्ये देशप्रेमाची भावना निर्माण करेन. गुन्हेगारांना गुन्हेगारीपासून बाजूला करण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न करेन.हे सगळे कधी होईल ?

जेव्हा मी पोलीस अधिकारी होईन ........

❖❖❖❖❖